ePaper

युद्धामुळे इराणमध्ये परिस्थिती भीषण; 66 टक्क्यांवर पोहोचला महागाई दर




वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 06 ऑगस्ट 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

वल्लभनगर म्हाडा वसाहतीवर धोक्याची छाया

## सर्वोच्च न्यायालयाची शिफारस; वाहन विम्याबाबत देशभरात बदलाचे संकेत

# ‘विमा नाही, तर पेट्रोल नाही’!

**महाईन्यूज । नागपूर**

देशभरात विमाविना धावणाऱ्या वाहनांवर आळा घालण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. वैध थर्ड पार्टी विमा नसलेल्या वाहनांना पेट्रोल पंपावर इंधन नाकारण्याची व्यवस्था करण्याबाबत पथदर्शी (पायलट) प्रकल्प राबविण्याची शिफारस न्यायालयाने केली आहे. यासाठी विमा नियामक प्राधिकरण (आयआरडीएआय) आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने संयुक्तपणे योजना तयार करावी, असे निर्देश न्यायालयाने दिले. न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा यांच्या खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण निर्णय देताना हा सक्तीचा आदेश नसून धोरणात्मक शिफारस असल्याचेही स्पष्ट केले.



### पोलिसांच्या हातात रिअल-टाइम तपासणी

रस्ते सुरक्षेला बळकटी देण्यासाठी विद्यमान एएनपीआर (ऑटोमॅटिक नंबर प्लेट रिकग्निशन) कॅमेरे विमा माहिती केंद्र आणि ‘वाहन’ पोर्टलशी जोडण्याचे निर्देश न्यायालयाने दिले. यामुळे विमाविना धावणाऱ्या वाहनांना स्वयंचलित ई-चलन पाठविता येईल. तसेच राज्य पोलिसांना विम्याची माहिती तात्काळ तपासता येईल, अशी मोबाईल ॲप किंवा हँडहेल्ड उपकरणे उपलब्ध करून देण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय, राष्ट्रीय महामार्गांवरील टोल नाक्यांवर वाहन न थांबवता स्वयंचलित ओळख प्रणालीचा पथदर्शी प्रयोग करण्याचाही सल्ला न्यायालयाने दिला.

### नव्या वाहनांसाठी दीर्घकालीन विमा, चार-स्तरीय पॉलिसी रचना

विमा व्यवस्थेत अधिक पारदर्शकता आणण्यासाठी खासगी वाहनांसाठी चार-स्तरीय विमा रचना लागू करण्याची सूचना न्यायालयाने स्वीकारली. यात अनिवार्य थर्ड पार्टी विमा, प्रवाशांसाठी ऐच्छिक संरक्षण, वैयक्तिक अपघात संरक्षण आणि वाहनाच्या नुकसानीसाठी स्वतंत्र ‘ओन डॅमेज’ कव्हर अशा पर्यायांचा समावेश असेल. प्रत्येक ग्राहकाला विमा घेताना ‘कस्टमर ऑप्शन फॉर्म’ देऊन कोणते अतिरिक्त संरक्षण घ्यायचे याची स्पष्ट निवड करता येईल. तसेच नव्या कारसाठी चार वर्षे आणि नव्या दुचाकीसाठी सहा वर्षांचा थर्ड पार्टी विमा अनिवार्य करण्याचे निर्देश देत आयआरडीएआयने तातडीने आवश्यक आदेश जारी करावेत, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

### ‘कॉम्प्रिहेन्सिव्ह’ विम्यात वाहनातील प्रवाशांनाही संरक्षण

या प्रकरणाची सुरुवात आंध्र प्रदेशातील टी. रामू यांच्या अपघाती मृत्यूपासून झाली. अज्ञात ट्रकच्या धडकेत त्यांचा मृत्यू झाला होता. मोटार अपघात न्यायाधिकरणाने विमा कंपनीची जबाबदारी नाकारली होती. मात्र, उच्च न्यायालयाने कॉम्प्रिहेन्सिव्ह विमा पॉलिसीअंतर्गत नुकसानभरपाई मंजूर केली. सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय कायम ठेवत १६ नोव्हेंबर २००९ च्या आयआरडीएआय परिपत्रकानुसार कॉम्प्रिहेन्सिव्ह पॉलिसीमध्ये वाहनातील प्रवाशांनाही विमा संरक्षण मिळते, असे स्पष्ट केले. तसेच अशा पॉलिसींचे फायदे विमा कंपन्यांनी आपल्या संकेतस्थळावर सोप्या भाषेत आणि सहज वाचता येईल अशा स्वरूपात प्रदर्शित करावेत, असे निर्देशही देण्यात आले.

# न्यायालयात गांजा प्रकरणानंतर खळबळ

## आरोपींना मुक्त भेटी, मोबाईल वापर आणि अमली पदार्थांची देवाणघेवाण उघड

**महाईन्यूज । पुणे**

**शिवाजीनगर न्यायालयात तारखेला आणलेल्या आरोपींना नातेवाइकांची मुक्त भेट, वाहनात बसून गप्पा, हॉटेलमधून जेवण, मोबाईलवर संभाषण आणि अगदी अमली पदार्थांची देवाणघेवाण होत असल्याचे प्रकार समोर आले होते. त्या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी संताप व्यक्त करीत न्यायालय परिसराचे तातडीने सुरक्षा ऑडिट करण्याचे आदेश पोलिसांना दिले आहेत.**



### न्यायालयाच्या आवारात रील्स

तारखेसाठी आलेल्या काही गुन्हेगारांनी न्यायालयाच्या परिसरात रील्स काढल्याचे प्रकार समोर आले आहेत. या प्रकाराची देखील पोलिस आयुक्तांनी गंभीर दखल घेतली आहे. अमली पदार्थांच्या विळख्यात अडकलेल्या तरुण पिढीला बाहेर काढण्यासाठी आणि ड्रग्जचे रॅकेट समूळ नष्ट करण्यासाठी पुणे पोलिसांनी आता कडक कारवाईचा इशारा दिला आहे. आत्तापर्यंत केवळ ड्रग्ज विकणाऱ्या पेडलर्स आणि सप्लायर्सवर कारवाई होत होती. आता थेट 'मागणी करणारे' म्हणजेच प्रत्यक्ष अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यांवरही मोठा बडगा उगारण्यास सुरुवात केली आहे.

न्यायालय आवारातील शौचालयामध्ये आरोपीला गांजा पुरविल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्यानंतर पोलिस आयुक्तांनी हे आदेश दिले आहेत. बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांना चकवा देत आरोपीच्या मित्राने थेट बाथरूममध्ये गांजा पोहचविला होता. त्यामुळे कोर्ट आवारातील सुरक्षेवर देखील प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. हा प्रकार आयुक्तांच्या कानावर जाताच त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांची खरडपट्टी काढली. 'न्यायालयासारख्या अतिसंवेदनशील ठिकाणी आरोपीपर्यंत अमली पदार्थ पोहचतोच कसा? अशी हिंमत होतेच कशी?' याचाच शोध घेण्यासाठी न्यायालयतील आरोपींच्या व त्यांना भेटण्यास येणाऱ्या नातेवाइकांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यास सांगण्यात आले आहे.

या प्रकरणात आरोपीसह गांजा पुरविणाऱ्या व्यक्तीवरही गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालय परिसरात आरोपींसाठी तयार झालेली 'मोकळीक' मोडून काढण्यासाठी पोलिस प्रशासनाने व्यापक उपाययोजना हाती घेतल्या आहेत. आरोपींना प्रत्येक वेळी प्रत्यक्ष न्यायालयात आणण्याऐवजी शक्य तितक्या सुनावण्या दृकश्राव्य प्रणालीद्वारे (व्हिडीओ कॉन्फरन्स) घेण्याबाबतही जास्तीत जास्त प्रयत्न करण्यात येणार आहे.

याशिवाय न्यायालयाच्या प्रवेशद्वारावरील तपासणी अधिक कठोर करण्यात येणार आहे. मेट्रोच्या कामामुळे आणि अन्य कारणांमुळे सुरक्षेत आलेली शिथिलता दूर करून प्रत्येक व्यक्तीची कसून तपासणी केली जाणार आहे. पान, तंबाखू, अमली पदार्थ तसेच संशयास्पद वस्तू न्यायालयात नेण्याचा कोणताही प्रयत्न खपवून घेतला जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. पोलिस प्रशासनाने संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत इशारा देत न्यायालय परिसरात अत्यंत कडक तपासणी आणि शिस्त राखण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालय परिसरातील सुरक्षेला प्राधान्य देण्यात येणार असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले आहे.

अमली पदार्थांच्या विळख्यात अडकलेल्या तरुण पिढीला बाहेर काढण्यासाठी आणि ड्रग्जचे रॅकेट समूळ नष्ट करण्यासाठी पुणे पोलिसांनी आता कडक कारवाईचा इशारा दिला आहे. आत्तापर्यंत केवळ ड्रग्ज विकणाऱ्या पेडलर्स आणि सप्लायर्सवर कारवाई होत होती. आता थेट 'मागणी करणारे' म्हणजेच प्रत्यक्ष अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यांवरही मोठा बडगा उगारण्यास सुरुवात केली आहे. ड्रग्जची मागणी आणि पुरवठा अशा दोन्ही साखळ्या एकाच वेळी उद्ध्वस्त करण्याचा इशारा पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे. एनडीपीएस कायद्यातील कलम ६४(ए) अंतर्गत पोलिस प्रशासनाने व्यसनाधीन व्यक्तींना एक मोठी संधी देखील उपलब्ध करून दिली आहे. कारवाई झालेल्या आरोपींना व्यसनमुक्ती केंद्रात जाऊन उपचार घेण्याचा पर्याय दिला जात आहे. आरोपींनी व्यसनमुक्ती केंद्रात जाऊन महिनाभराचे उपचार पूर्ण केल्यास, पोलिस प्रशासन त्यांच्याबाबत सकारात्मक भूमिका घेईल. मात्र, ज्यांनी ही संधी नाकारली किंवा न्यायालयात सहकार्य केले नाही, त्यांच्यावर कडक कारवाई केली जाणार आहे.

# ‘पिंक ई-रिक्षा’साठी अडथळ्यांचीच वाट; महिलांकडून प्रतिसाद नाही

**महाईन्यूज । पुणे**

**राज्य सरकारने महिलांसाठीच्या ‘पिंक ई-ऑटो’ योजनेतील अनुदान २० टक्क्यांवरून ४० टक्क्यांपर्यंत वाढविले. मात्र, अपुरी माहिती, गुंतागुंतीची प्रकिया, आर्थिक अडचणी आणि त्यात उत्पन्नाच्या शंकेमुळे महिलांकडून या योजनेला प्रतिसाद मिळत नसल्याचे चित्र आहे.**



> अनुदानातील वाढ हा स्वागतार्ह आहे. पण, वेळेत अंमलबजावणी आणि संस्थात्मक पाठबळाशिवाय या योजनेचा लाभ महिलांपर्यंत पोहोचणार नाही. योजनेची प्रसिद्धी अजूनही कमीच आहे. महिला आणि बालविकास विभागाने या उपक्रमाबाबत व्यापक जनजागृती करण्याची गरज आहे. पुरुष रिक्षाचालकांमध्ये जनजागृती करून महिला चालकांना रिक्षा स्टँडचा समान वापर करता यावा, यासाठीही प्रयत्न होणे आवश्यक आहे. स्वतःच्या मालकिची रिक्षा आणि ती स्वतः चालविणे यामुळे महिलांचा आत्मविश्वास वाढत आहे. अनुदानातील वाढीमुळे महिलांवर सुरुवातीला पडणारा आर्थिक भार कमी होण्यास मदत होईल.
>
> **- शर्मिला देव, वरिष्ठ कार्यक्रम सहयोगी, परिसर**

परिसर आणि ‘असर सोशल इम्पॅक्ट अॅडव्हायझर्स’ या संस्थांनी केलेल्या स्वतंत्र सर्वेक्षणात योजनेच्या अंमलबजावणीत अनेक अडथळे असल्याचे समोर आले आहे. अपुरी माहिती, कागदपत्रांची गुंतागुंत, अर्ज प्रक्रियेला होणारा विलंब, स्वतःचा वाटा उचलण्यासाठी येणाऱ्या आर्थिक अडचणी, कर्ज मंजुरीतील अडथळे आणि व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नाची शंका आदी कारणांमुळे महिलांकडून या योजनेला प्रतिसाद मिळत नसल्याचे प्रत्यक्षात स्वीकारणे कठीण जात असल्याचे सर्वेक्षणात नमूद करण्यात आले आहे.

राज्यातील १७ शहरांतील १० हजार महिलांना ‘पिंक ई-रिक्षा’ देण्याचे उद्दिष्ट सुरुवातीला ठेवण्यात आले होते. त्यात पुण्यासाठी १ हजार ४००, पिंपरी-चिंचवडसाठी ६०० पिंक ई-रिक्षांचा समावेश होता. त्यानंतर पुणे जिल्ह्यातील लाभार्थ्यांची संख्या वाढवून ४ हजारापर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी या वर्षाअखेर पाच हजार महिलांना पिंक ई-रिक्षा देणार असल्याचे आश्वासन विधिमंडळात दिले. लाभार्थी महिलांची संख्या वाढविण्यासाठी २० टक्क्यांवरून ४० टक्क्यांपर्यंत अनुदान वाढ करण्यात आली. मात्र, अद्यापही महिलांकडून प्रतिसाद मिळत नसल्याचे चित्र आहे. पुणे जिल्ह्यासाठी सुमारे चार हजार ‘पिंक ई-रिक्षा’चे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. मात्र, आतापर्यंत केवळ १७ महिलांकडेच पिंक ई-रिक्षा आहे.

दरम्यान, अर्ज प्रक्रिया सुलभ करण्यासह जिल्हास्तरावर तक्रार निवारण यंत्रणा, मेट्रो स्थानके आणि महत्त्वाच्या गर्दीच्या ठिकाणी ‘पिंक ई-ऑटो’साठी स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था करावी, अशा शिफारसीही या सर्वेक्षणात करण्यात आल्या आहेत.

# वल्लभनगर म्हाडा वसाहतीवर धोक्याची छाया

## अहिल्याबाई होळकर मैदानालगतची झाडे धोकादायक स्थितीत; फांद्या कोसळण्याची भीती

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**वल्लभनगर व संत तुकारामनगर येथील म्हाडा वसाहतीत पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर गंभीर धोक्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक वर्षांपूर्वी उभारलेल्या या वसाहतीत आजही शेकडो कुटुंबे वास्तव्यास आहेत. मात्र, परिसरातील अहिल्याबाई होळकर मैदानाच्या कडेला असलेली विशाल झाडे अनियंत्रित वाढल्याने त्यांच्या तब्बल 15 ते 20 फूट लांबीच्या फांद्या थेट घरांच्या छतांवर, गच्च्यांवर आणि अंगणांवर लोंबकळत आहेत. जोरदार वारा किंवा मुसळधार पावसात या फांद्या कोसळल्यास जीवित व वित्तहानी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.**



> झाडांच्या फांद्या तुटणे, फांद्या पडणे किंवा मोठी झालेली धोकादायक झाडे याबाबत वेळोवेळी तक्रारी येत असतात. अशा प्रत्येक तक्रारीची आम्ही तात्काळ दखल घेतो आणि संबंधित ठिकाणी पाहणी करून आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना देत असतो. सदर ठिकाणाचीही पाहणी करून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. पाऊस सुरू असल्यामुळे सध्या सर्वत्र झाडांची छाटणी सुरू आहे. याबाबत तात्काळ संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांशी बोलून आवश्यक त्या सूचना दिल्या जातील. ज्या ठिकाणी धोकादायक झाडे किंवा फांद्या असल्याची तक्रार असेल त्या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करून प्राधान्याने छाटणी केली जाईल. जेणेकरून कोणतीही अनुचित घटना घडणार नाही आणि नागरिकांच्या सुरक्षिततेची योग्य काळजी घेतली जाईल.
>
> **- योगेश बहल, नगरसेवक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

अहिल्याबाई होळकर मैदान हे परिसरातील नागरिकांसाठी विरंगुळा, व्यायाम आणि खेळाचे प्रमुख केंद्र आहे. दररोज सकाळी व संध्याकाळी येथे महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक आणि लहान मुले मोठ्या संख्येने फेरफटका मारण्यासाठी, व्यायाम करण्यासाठी आणि खेळण्यासाठी येतात. मात्र, मैदानालगत वाढलेल्या धोकादायक फांद्या कधीही तुटून मैदानात येणाऱ्या नागरिकांवर कोसळू शकतात. त्यामुळे घरांमध्ये राहणाऱ्या नागरिकांसोबतच मैदानात येणाऱ्या शेकडो नागरिकांच्या सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. झाडांच्या वाढलेल्या फांद्यांमुळे अनेक घरांमध्ये सूर्यप्रकाश आणि नैसर्गिक हवा पोहोचेनाशी झाली आहे. पावसाळ्यात सतत ओलावा राहिल्याने साप, विंचू व इतर विषारी कीटकांचा वावर वाढण्याची भीती निर्माण झाली असून, नागरिकांचे दैनंदिन जीवनही त्रस्त झाले आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या धोकादायक परिस्थितीबाबत महापालिकेकडे तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे प्रशासन एखादी दुर्घटना घडल्यानंतरच जागे होणार का, असा संतप्त सवाल परिसरातील रहिवासी उपस्थित करत आहेत. स्थानिक नागरिक स्पष्टपणे सांगतात आमची झाडे तोडण्याची मागणी नाही मात्र घरांवर आणि मैदानाच्या परिसरात धोकादायकरीत्या लोंबकळणाऱ्या फांद्यांची तातडीने छाटणी करावी. एखादा निष्पाप नागरिक किंवा खेळणारे मूल जखमी झाल्यानंतर कारवाई करून काहीही उपयोग होणार नाही.

वल्लभनगर - संत तुकारामनगर येथील म्हाडा वसाहतीमध्ये धोकादायक परिस्थिती निर्माण झाली असून, अहिल्याबाई होळकर मैदानालगतची अनेक झाडे अनियंत्रितपणे वाढली आहेत. या झाडांच्या सुमारे १५ ते २० फूट लांबीच्या फांद्या थेट परिसरातील घरांवर लोंबकळत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. विशेषतः पावसाळ्यात जोरदार वाऱ्यामुळे या फांद्या कधीही तुटून कोसळू शकतात, अशी भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे रहिवाशांच्या जीवितासह मालमत्तेलाही धोका निर्माण झाला आहे.

अहिल्याबाई होळकर मैदानात दररोज महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. अशा परिस्थितीत एखादी फांदी अचानक कोसळल्यास मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे. अनेक वेळा महापालिकेकडे तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. त्यामुळे संभाव्य अनर्थ टाळण्यासाठी धोकादायक फांद्यांची तातडीने छाटणी करून परिसर सुरक्षित करण्याची जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत महापालिकेने कोणतीही दुर्घटना घडण्यापूर्वी तातडीने धोकादायक फांद्यांची छाटणी करून परिसर सुरक्षित करावा, अशी जोरदार मागणी नागरिकांनी केली आहे.

# लोणावळ्यात ५० फूट दरीत कोसळली कार, पोलिसांनी वाचवला चालकाचा जीव

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**खंडाळा घाटातील गारमाळ रस्त्यावर सोमवारी सकाळी एका थरारक अपघाताची घटना घडली. दरीतील निसर्गरम्य दृश्य पाहण्याच्या मोहापायी चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने कार तब्बल ५० फूट खोल दरीत कोसळली. मात्र, महामार्ग पोलिसांनी दाखवलेल्या प्रसंगावधान आणि धाडसी बचाव मोहिमेमुळे चालकाला सुखरूप बाहेर काढण्यात यश आले आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, चालक मोहित स्वरूप भटनागर (५१, रा. गुरुग्राम, हरियाणा) हे सोमवारी सकाळी गारमाळ रस्त्यावरून प्रवास करत होते. प्रवासादरम्यान कनेक्टिंग लिंकवरील ब्रिजचे विहंगमय दृश्य पाहण्याच्या मोहापायी त्यांनी कार कच्च्या रस्त्यावर घेतली.

मात्र, अचानक चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले आणि कार थेट दरीत कोसळली. चार ते पाच पलट्या खात कार तब्बल ५० फूट खाली दरीत जाऊन पडली. अपघाताचे भयानक स्वरूप पाहून उपस्थितांनी चालक वाचण्याची आशाच सोडली होती.

घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलिस केंद्र बोरघाट येथील प्रभारी अधिकारी स्वप्नील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथक अवघ्या काही मिनिटांत घटनास्थळी दाखल झाले. अत्यंत खोल आणि धोकादायक दरीत उतरणे कठीण असतानाही महामार्ग पोलिस पथकातील कर्मचाऱ्यांनी स्वतःचा जीव धोक्यात घातला.

दोरीच्या साहाय्याने आणि अत्यंत सावधगिरीने बचावकार्य सुरू करण्यात आले. अथक प्रयत्नांनंतर गंभीर अपघातातही चालकाला सुखरूप बाहेर काढण्यात यश आल्याने उपस्थित नागरिकांनी महामार्ग पोलिसांच्या धाडसाचे आणि तत्परतेचे कौतुक केले.

पोलिस कर्मचारी संदीप पवार, किरण शिंदे, भरत पावरा, गणेश खाडे, संतोष गुजरवार आणि गोडसे या पोलिस कर्मचाऱ्यांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने दरीत उतरून कारमध्ये अडकलेल्या मोहित भटनागर यांना सुखरूप बाहेर काढले. त्यानंतर तातडीने रुग्णवाहिकेतून त्यांना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात हलवण्यात आले.

### चालक सुखरूप; पोलिस दलाचे कौतुक

या भीषण अपघातात सुदैवाने चालक मोहित भटनागर यांना किरकोळ दुखापत झाली आहे. जर महामार्ग पोलिसांच्या मदतीला काही क्षणांचा जरी उशीर झाला असता, तर जीवितहानी झाली असती असा अंदाज व्यक्त केला जात आहे. महामार्ग पोलिसांनी दाखवलेली प्रसंगावधानता, धाडस आणि तत्परतेमुळे एका नागरिकाचा जीव वाचला असून, या यशस्वी बचावकार्यासाठी महामार्ग पोलिस दलावर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.



## भूमिका

# प्रश्न राजकीय पक्षांच्या विश्वासार्हतेचा

**देशात आंदोलन उभे करायचे असेल, तर पूर्वी राजकीय पक्षांची गरज भासत होती. आज एका हॅशटॅगने, एका यूट्यूब व्हिडीओने किंवा एका टेलिग्राम समूहाने ते काम सुरू केले आहे. 'नीट' परीक्षेत वाद, सोशल मीडियावर अचानक चर्चेत आलेल्या 'कॉक्रोच जनता पार्टी'सारख्या डिजिटल समूहांची वाढ.**



या बदलाला केवळ सोशल मीडिया जबाबदार नाही, तर विचारधारा सोडून सत्तेसाठी होणाऱ्या आघाड्या, पक्षांतराची मालिका, घराणेशाही, निवडणुकीपुरता जनसंपर्क आणि तरुणांच्या प्रश्नावरील मौन हे राजकीय पक्षांचे वर्तन जबाबदार आहे. गेल्या दशकात भारतीय राजकारणाचा केंद्रबिंदू विधानसभापासून स्मार्ट फोनच्या स्क्रीनवर सरकला आहे. पक्षांचे जाहीरनामे वाचणाऱ्यांपेक्षा रिल्स पाहणाऱ्यांची संख्या अधिक आहे. पक्षांच्या पत्रकार परिषदांपेक्षा सोशल मीडियावरील ट्रेंड जनमत घडवू लागले आहेत. ही केवळ तांत्रिक क्रांती नाही, तर राजकीय विश्वासार्हतेच्या संकटाची घंटा वाजते आहे. त्याविषयी राजकीय पक्षांनी गांभीर्याने घेतले नाही, तर उद्या जनाधारातून मिळालेली बहुमताची सत्ताही उलथवून टाकली गेली, तर आश्चर्य वाटायचे कारण नाही.

जगातील अनेक लोकशाहींनी सोशल मीडियाच्या राजकीय प्रभावाची झळ अनुभवली आहे. अरब स्प्रिंगपासून ब्रिटनमधील ब्रेक्झिट जनमत, अमेरिकेची २०१६ ची राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक, ब्राझीलमधील बोल्सोनारो यांचा उदय आणि फिलिपीन्समध्ये डुटर्टे-मार्कोस यांच्या डिजिटल प्रचार यंत्रणेपर्यंत प्रत्येक ठिकाणी सोशल मीडिया हा केवळ संवादाचे माध्यम राहिलेला नाही. तो जनमत घडविणारा आणि राजकीय कथानकाला दिशा देणारा निर्णायक घटक ठरला आहे. भारतातही 'नीट', आरक्षण आणि ई-२० इथेनॉल ब्लेंडिंगसारख्या विषयांवर निर्माण होणाऱ्या डिजिटल मोहिमा ही त्याच जागतिक प्रवाहाची भारतीय आवृत्ती मानावी लागेल. प्रश्न सोशल मीडियाचा नाही, तर पारंपरिक राजकीय पक्षांनी जनतेचा विश्वास इतका गमावला आहे की, लोक आता पक्षांपेक्षा प्लॅटफॉर्मवर विश्वास ठेवू लागले आहेत. त्याची जबाबदारी आता देशातील सर्वच राजकीय पक्षांना घ्यावी लागेल. चुका सुधाराव्या लागतील. अन्यथा, लोकशाहीचा ढाचाच बदलू शकतो.

'नीट' प्रकरणाने याचे निर्विवादपणे दर्शन घडविले. लाखो विद्यार्थी आणि पालक रस्त्यावर उतरण्यापूर्वी सोशल मीडियावर एकत्र आले. डिजिटल दबाव इतका प्रबळ ठरला की, सरकार, राष्ट्रीय परीक्षा संस्था आणि सर्वोच्च न्यायालयातही तत्काळ भूमिका स्पष्ट करावी लागली. या आंदोलनात राजकीय पक्ष नंतर आले; परंतु जनमत त्यापूर्वीच तयार झाले होते. विरोधी पक्षांनी या जनमताचा आपल्या राजकारणासाठी फास्टफूडसारखा वापर करून घेतला; परंतु हेच गंडांतर बिगर भाजपशासित संस्थांवर आले, तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

ई-२० इथेनॉल ब्लेंडिंगचेही तसेच झाले. ऊस उत्पादक, पर्यावरण आणि ऊर्जा सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या धोरणावर वैज्ञानिक चर्चेपेक्षा सोशल मीडियावरील भीतीचे संदेश अधिक वेगाने पसरले. यावरून मायलेज घटले हा विषय अधिक प्रभावी आणि वास्तवदर्शी ठरला.

## प्रासंगिक »

# कोल्ह्याची भूक

**एकदा एक कोल्हा भुकेने व्याकुळ होऊन अन्नासाठी भटकत होता. तेवढ्यात त्याला एक मोठ्ठा आवाज ऐकू आला. त्या आवाजाने कोल्हा घाबरला.**

पण तो आवाज कोणता प्राणी काढतोय हे जाणून घेण्याची उत्सुकता त्याला स्वस्थ बसू देईना. तो त्या आवाजाच्या दिशेने निघाला. शोधता शोधता त्या आवाजापर्यंत गेला, तेव्हा त्याच्या नजरेला एक नगारा दिसला.


त्यावर एका झाडाची फांदी वाऱ्याने आपटत होती. म्हणून तो आवाज निघत होता. हे पाहून कोल्हा त्या नगाऱ्यावर चढला व त्यावर पाय आपटू लागला. थोड्या वेळाने त्याला वाटले की, हे कातडे जर ओरबाडून काढले, तर आत खूप मांस मिळेल, दोन दिवसांची भूक भागेल.

तो कातडे कुरतडू लागला. त्याच्या दाढा दुखू लागल्या आणि कातडे फाटले, तेव्हा त्याला मांस न दिसल्याने तो दुःखी झाला. त्याला वाईट वाटले.

- तात्पर्य : **जो माणूस मागचा-पुढचा विचार करून वागतो, त्यावर पश्चाताप करण्याची वेळ येत नाही. अविचाराने कोणतीही गोष्ट केली की, वाट्याला दुःखच येते.**

महाराष्ट्रातील कळसुबाईपासून महाबळेश्वर, कोकण किनारपट्टी तसेच गोवा, कर्नाटक, तामिळनाडू आणि केरळमधील निलगिरीपर्यंत पसरलेला हा पर्वतीय पट्टा अनेक नद्यांचा उगमस्थान असल्याने पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील आहे.

# विकास आणि पर्यावरणाचा सुवर्णमध्य आवश्यक



पश्चिम घाटाचे महत्त्व लक्षात घेऊन पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांच्या समितीने या भागाला पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र घोषित करण्याची शिफारस केली होती. समितीने संपूर्ण परिसराचे तीन विभाग करून अतिसंवेदनशील भागात विकास प्रकल्पांवर बंदी, तर इतर भागांत मर्यादित विकासाची भूमिका मांडली. मात्र, या शिफारशींमुळे शेती, घरबांधणी, उद्योग आणि स्थानिक रोजगारावर परिणाम होईल, अशी भीती व्यक्त करण्यात आली. त्यामुळे पश्चिम घाटातील अनेक राज्यांनी या अहवालाला विरोध दर्शविला.

यानंतर केंद्र सरकारने डॉ. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली नवीन समिती नेमली. या समितीने पश्चिम घाटातील सुमारे ३७ टक्के क्षेत्रच पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील म्हणून निश्चित करण्याचा प्रस्ताव दिला. तरीही या अहवालावरही एकमत झाले नाही. परिणामी, केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयाला सातव्यांदा मसुदा अधिसूचना प्रसिद्ध करावी लागली असून, त्यावर पुढील ६० दिवसांत हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत.

अंतिम अधिसूचना लागू झाल्यास खाणकाम, मोठे उद्योग, औष्णिक ऊर्जा प्रकल्प आणि मोठ्या बांधकामांवर निर्बंध येण्याची शक्यता आहे. त्यामुळे विकास आणि पर्यावरण यांच्यातील समतोलाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. दरम्यान, पश्चिम घाटात रस्ते, बोगदे, पूल आणि विविध विकासकामे मोठ्या प्रमाणात सुरूच आहेत. त्याचबरोबर खाणकाम आणि जंगलांवरील वाढते अतिक्रमणही सुरू असल्याने पर्यावरणावर त्याचे गंभीर परिणाम दिसून येत आहेत.

गेल्या काही वर्षांत कोकणासह केरळपर्यंत अतिवृष्टी, महापूर, भूस्खलन आणि दरडी कोसळण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. यंदाच्या पावसाळ्यातही अनेक घाटमार्ग बंद ठेवावे लागले, तर पूरस्थितीमुळे अनेक भागांचा संपर्क तुटला. नैसर्गिक जलप्रवाहांमध्ये मानवी हस्तक्षेप झाल्याने रस्ते जलमय होणे आणि भूस्खलनाचा धोका अधिक वाढला आहे. पर्यावरणतज्ज्ञांच्या मते, पश्चिम घाटातील अनियंत्रित विकास आणि नैसर्गिक रचनेत होणारे बदल हे या संकटामागील प्रमुख कारणांपैकी एक आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आलिंगनें घडे ।
मोक्ष सायुज्यता जोडे ॥१॥

ऐसा संताचा महिमा ।
जाली बोलायाची सीमा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# फक्त कागदावरच होते कर्मचारी!

## मुंबई पोलीस दलात ६.५ कोटींचा पगार घोटाळा झाला असल्याची बाब समोर

**महाईन्यूज । मुंबई**

**मुंबई पोलिस दलाच्या प्रशासकीय व्यवस्थेला हादरा देणारा धक्कादायक वेतन घोटाळा उघडकीस आला आहे. प्रत्यक्षात अस्तित्वातच नसलेल्या तब्बल १० बनावट कर्मचाऱ्यांच्या नावावर सुमारे ६ कोटी ४१ लाख रुपयांचे वेतन काढण्यात आल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. या प्रकरणी गुन्हे शाखेने पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून आर्थिक गैरव्यवहाराची व्याप्ती आणखी मोठी असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**



या घोटाळ्यामागे आणखी काही अधिकारी किंवा कर्मचारी सहभागी होते का, याचाही तपास सुरू आहे.

मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून संबंधित कागदपत्रे, वेतन नोंदी, बँक व्यवहार आणि मंजुरी प्रक्रियेची तपशीलवार छाननी केली जात आहे. वेतन कोणत्या खात्यांमध्ये जमा झाले, त्याचा लाभ प्रत्यक्षात कोणी घेतला आणि संपूर्ण साखळीमध्ये कोणाचा सहभाग होता, याचा शोध घेण्यासाठी आर्थिक व्यवहारांचे फॉरेन्सिक विश्लेषणही करण्यात येत आहे.

या प्रकरणातील प्राथमिक तपासानंतर दोन अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत आणखी काही अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई होण्याची शक्यता नाकारता येत नाही. संबंधित विभागातील कामकाजाचे विशेष लेखापरीक्षण (ऑडिट) सुरू करण्यात आले असून मागील काही वर्षातील वेतन नोंदींची पुन्हा तपासणी केली जात आहे.

या घोटाळ्यामुळे सरकारी विभागांमधील वेतन वितरण प्रणालीतील त्रुटी अधोरेखित झाल्या आहेत. कर्मचारी नोंदणी, सेवा पडताळणी, बँक खात्यांची सत्यता आणि नियमित लेखापरीक्षण यामध्ये झालेल्या निष्काळजीपणाचा गैरफायदा घेतल्याचे प्राथमिक चित्र आहे. तज्ज्ञांच्या मते, डिजिटल पडताळणी आणि नियमित ऑडिट प्रभावीपणे राबवले असते तर इतक्या मोठ्या प्रमाणातील आर्थिक गैरव्यवहार लवकर उघडकीस आला असता. सध्या गुन्हे शाखा संपूर्ण प्रकरणातील आर्थिक साखळी उलगडण्याचा प्रयत्न करत आहे. बनावट कर्मचाऱ्यांची नावे कोणी तयार केली, मंजुरी कोणी दिली, पैसे नेमके कोणाकडे पोहोचले आणि या घोटाळ्यामागे संघटित रॅकेट होते का, याची चौकशी सुरू आहे. तपास जसजसा पुढे सरकेल तसतसे आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### काय आहे संपूर्ण प्रकरण?

मुंबई पोलिस दलातील वेतन वितरण प्रक्रियेदरम्यान काही संशयास्पद आर्थिक व्यवहार आढळल्यानंतर या प्रकरणाची चौकशी सुरू करण्यात आली. तपासादरम्यान धक्कादायक बाब समोर आली की, पोलिस दलात कधीही सेवा न बजावलेल्या आणि प्रत्यक्षात अस्तित्वात नसलेल्या १० व्यक्तींची नावे अधिकृत नोंदींमध्ये समाविष्ट करण्यात आली होती. त्यानंतर या बनावट कर्मचाऱ्यांच्या नावावर नियमित वेतन मंजूर करून ते विविध बँक खात्यांमध्ये जमा करण्यात आले. हा प्रकार २०१९ ते २०२० या कालावधीत घडल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

### तब्बल सहा वर्षांनी उघड झाला घोटाळा

विशेष म्हणजे हा आर्थिक गैरव्यवहार जवळपास सहा वर्षे कोणाच्याही लक्षात आला नाही. अंतर्गत पडताळणी आणि कागदपत्रांची छाननी करताना बनावट कर्मचाऱ्यांचा माग काढण्यात यश आले. या प्रकरणामुळे पोलिस दलातील आर्थिक नियंत्रण व्यवस्था, लेखापरीक्षण आणि प्रशासकीय देखरेखीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या घोटाळ्याप्रकरणी संबंधित प्रशासकीय प्रक्रियेत सहभागी असलेल्या पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बनावट कागदपत्रे तयार करणे, वेतन नोंदींमध्ये फेरफार करणे, आर्थिक व्यवहारांना मंजुरी देणे आणि शासनाची फसवणूक करणे अशा विविध कलमांखाली कारवाई सुरू करण्यात आली आहे.

## नितीन गडकरींविरोधात 'डीपफेक' व्हिडिओ बनवणाऱ्यांना मुंबई उच्च न्यायालयाचा दणका!

**महाईन्यूज । मुंबई**

**इथेनॉलमिश्रित पेट्रोल (E20) धोरणावरून केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याविरोधात समाजमाध्यमांवर पसरवले जाणारे 'डीपफेक' आणि एआय-निर्मित व्हिडिओ मुंबई उच्च न्यायालयाने अत्यंत गंभीरतेने घेतले आहेत. न्यायालयाने नितीन गडकरी यांच्याबाबतचे हे सर्व आक्षेपार्ह आणि बदनामीकारक व्हिडिओ तातडीने हटवण्याचे निर्देश दिले आहेत.**



### भ्रष्टाचाराच्या खोट्या आरोपावरून कायदेशीर लढा

याचिकेत नमूद केल्यानुसार, सोशल मीडियावर पसरवलेल्या डीपफेक व्हिडिओंमध्ये नितीन गडकरी आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी E20 धोरणाचा वापर करून अवाजवी आर्थिक फायदा मिळवल्याचा चुकीचा दावा करण्यात आला होता. यामध्ये भ्रष्टाचार, घराणेशाही, पदाचा दुरुपयोग आणि अधिकारांचा गैरवापर यांसारखे बेछूट व तथ्यहीन आरोप करण्यात आले होते. गडकरी यांनी न्यायालयात किमान २४ विशिष्ट लिंक्स आणि पोस्ट्सचा उल्लेख करत त्या तातडीने हटवण्याची मागणी केली होती.

न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या एकल खंडपीठाने हे स्पष्ट केले की, गडकरी यांनी त्यांच्या याचिकेत दाखवलेली सर्व सामग्री सकृतदर्शनी बदनामीकारक आहे. त्यामुळे इंटरनेटवरून ती तात्काळ हटवण्यात यावी, तसेच भविष्यातही गडकरी यांनी अशा प्रकारची कोणतीही बदनामीकारक माहिती न्यायालयाच्या निदर्शनास आणल्यास तीही हटवावी, असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत.

सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर चालणाऱ्या आक्षेपार्ह सामग्रीबाबत तीव्र चिंता व्यक्त केली. अशा प्रकारची आक्षेपार्ह किंवा बदनामीकारक माहिती स्वतःहून हटवण्यासाठी प्लॅटफॉर्म्सकडे कोणतीही सक्षम यंत्रणा उपलब्ध नाही, ज्यामुळे नागरिकांना दिलासा मिळवण्यासाठी वारंवार न्यायालयाचे दरवाजे ठोठावावे लागतात, यावर खंडपीठाने बोट ठेवले.

यापूर्वी २७ जुलै रोजी न्यायमूर्ती अभय आहुजा यांच्या खंडपीठाने नितीन गडकरी यांना X (ट्विटर), मेटा (फेसबुक/इन्स्टाग्राम), GOOGLE आणि अज्ञात युझर्सविरोधात बदनामीकारक व डीपफेक सामग्रीप्रकरणी याचिका दाखल करण्याची परवानगी दिली होती.

गडकरी यांनी स्पष्ट केले की, २०१४ पासून ते रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री म्हणून कार्यरत आहेत आणि E20 पेट्रोल धोरणाच्या निर्णय प्रक्रियेत किंवा अंमलबजावणीत त्यांचा कोणताही थेट किंवा वैयक्तिक सहभाग नाही. तरीही अज्ञात युझर्सकडून एआयच्या मदतीने खोटे व्हिडिओ तयार करून त्यांना या धोरणाचे सूत्रधार आणि जबाबदार म्हणून दाखवले जात आहे. "सार्वजनिक आयुष्यात धोरणांवर होणारी लोकशाही मार्गातील निष्पक्ष टीका, चर्चा किंवा मतभेदांचा मी पूर्ण आदर करतो. हे न्यायालयीन पाऊल कोणाचाही बोलण्याचा अधिकार हिरावून घेण्यासाठी नाही. मात्र, एआय आणि डीपफेकचा वापर करून केलेली चरित्रहनन करणारी, खोटी आणि बदनामीकारक सामग्री कायदेशीर अपराध आहे," असे नितीन गडकरी यांनी आपल्या याचिकेत स्पष्ट केले आहे.

# मार्क झुकरबर्ग यांना ३ दिवसांचा अल्टीमेटम!

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा एक महत्त्वाचा व्हिडिओ हटवल्याप्रकरणी 'मेटा'ला दणका!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा एक महत्त्वाचा व्हिडिओ फेसबुकवरुन काही वेळासाठी हटवल्याप्रकरणी केंद्र सरकार आणि संसदीय समिती आक्रमक झाली आहे. आता संसदीय समितीनं 'मेटा'चे प्रमुख मार्क झुकरबर्ग यांना तीन दिवसांचा अल्टीमेटम दिला आहे. झुकरबर्ग यांनी याप्रकरणी बिनशर्त माफी न मागितल्यास भारतात मेटा प्लॅटफॉर्म्सला माहिती तंत्रज्ञान (IT) कायद्यांतर्गत मिळणारे कायदेशीर संरक्षण मागे घेतले जाईल, असा सडेतोड इशारा लोकसभा सचिवालयानं दिला आहे.**





"जर मार्क झुकरबर्ग यांनी हे पत्र मिळाल्यापासून ३ दिवसांच्या आत बिनशर्त माफी मागितली नाही, तर आयटी कायद्याच्या कलम ७९(३) अंतर्गत त्यांना मिळणारी कायदेशीर सवलत काढून घेतली जाईल आणि त्यांच्यावर प्रकाशक म्हणून कारवाई केली जाऊ शकते."

आयटी कायद्याचे कलम ७९ सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सना 'मध्यस्थ' म्हणून कायदेशीर संरक्षण देते. म्हणजेच, वापरकर्त्यांनी (युजर्स) पोस्ट केलेल्या मजकुरासाठी कंपनीला थेट दोषी धरले जात नाही. मात्र, जर हे संरक्षण काढून घेतले गेले, तर प्लॅटफॉर्मवर पोस्ट होणाऱ्या कोणत्याही वादग्रस्त मजकुरासाठी थेट मेटा आणि मार्क झुकरबर्ग यांच्यावर प्रकाशक म्हणून फौजदारी किंवा कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते.

याशिवाय, बाल लैंगिक शोषणाशी संबंधित मजकूर आणि महिलांचा अवमान करणाऱ्या सामग्रीवर कठोर कारवाई करण्याची मागणीही या समितीने केली आहे.

संसदीय समितीचे अध्यक्ष आणि भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी या घटनेमागे देश अस्थिर करण्याचा कट असल्याचा संशय व्यक्त केला आहे. "भारताच्या पंतप्रधानांचा व्हिडिओ मध्यरात्री १२:३० ते सकाळी ५ वाजेदरम्यान ५ तासांसाठी हटवला जातो, ही अतिशय गंभीर बाब आहे. याप्रकरणी झुकरबर्ग यांनी स्वतः माफी मागितली पाहिजे," अशी आक्रमक भूमिका खासदार निशिकांत दुबे यांनी मांडली.

या बैठकीत उपस्थित असलेल्या विरोधी पक्षाच्या सदस्यांनी वेगळी भूमिका मांडली. "विरोधात बोलणे किंवा असंतोष व्यक्त करणे हा गुन्हा ठरू शकत नाही, तसेच उपरोधिक टिप्पणीला (SATIRE) देशद्रोह मानता येणार नाही," असे मत विरोधकांनी नोंदवले.

मेटाच्या प्रवक्त्याने या घटनेबद्दल स्पष्टीकरण देताना सांगितले की, ही कारवाई त्यांच्या 'ऑटोमेटेड कंटेंट फिल्टर'मधील तांत्रिक बिघाडामुळे (GLITCH) झाली होती. पंतप्रधान मोदींचा व्हिडिओ चुकीने हटवला गेला होता आणि तो आता पुन्हा बहाल करण्यात आला आहे. तसेच, भविष्यात अशा महत्त्वाच्या खात्यांवरील पोस्टवर अधिक लक्ष ठेवले जाईल, असेही मेटाने स्पष्ट केले.

### नेमकं प्रकरण काय होतं?

माहिती तंत्रज्ञानविषयक संसदीय स्थायी समितीची एक महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत गृह मंत्रालय, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय (MEITY) आणि मेटासह विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विद्यार्थ्यांना संबोधित करणारा व्हिडिओ ५ ते ६ तास फेसबुकवर उपलब्ध नव्हता, या मुद्द्यावरून समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. लोकसभेच्या संचालक ए. जोतिर्मयी यांनी इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे सचिव एस. कृष्णन यांना पाठवलेल्या पत्रात या घटनेची गंभीर दखल घेण्यात आल्याचे म्हटले आहे.

# युद्धामुळे इराणमध्ये परिस्थिती भीषण; ६६ टक्क्यांवर पोहोचला महागाई दर

**महाईन्यूज । इराण**

**अमेरिका आणि इस्रायविरोधातील युद्ध सहाव्या महिन्यांनंतरही सुरु असल्याने इराणवर आर्थिक संकट ओढवलं आहे. इराणमधील नागरिकांना उदरनिर्वाह करण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. आर्थिक संकट आणि महागाईमुळे नागरिक आता केस आणि अत्तराच्या रिकाम्या बाटल्यांची देखील विक्री करत आहेत. नागरिकांनी वस्तू खरेदी करण्याऐवजी रोजचे काम व अभ्यासासाठी लॅपटॉपसह इतर उपकरणं भाड्याने घेण्यावर भर दिला आहे.**




### दैनंदिन गरजा भागविण्यासाठी संघर्ष

इराणी वृत्तसंस्था आयएलएनएने याबाबतचे वृत्त प्रसिद्ध केले आहे. आयएलएनएने इराणमधील या आर्थिक स्थितीला सर्व्हायव्हल इकॉनॉमी असे म्हटले आहे. इराणी नागरिकांना उत्पन्नाचे नवे मार्ग शोधावे लागत आहेत, तसेच घरातील विविध वस्तूंची विक्री देखील करावी लागत आहे. ऑनलाइन क्लासिफाइड वेबसाइट्सवर याबाबतच्या जाहिरातींमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. नागरिकांना महागाईचा प्रचंड फटका बसला असून, दैनंदिन गरजा भागविण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. रोजगाराच्या अभावामुळे अनेक तरुण परदेशात संधी शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. कुशल मनुष्यबळाचे स्थलांतर वाढल्याने देशाच्या दीर्घकालीन आर्थिक विकासासमोरही नवीन आव्हाने निर्माण होत आहेत.

नागरिकांनी ऑनलाइनवर जुने कामाचे शूज आणि कपडे, रिकाम्या अत्तराच्या बाटल्या, हेअर एक्स्टेंशनसाठी वापरले जाणारे नैसर्गिक केस आणि आर्थिक हमी म्हणून मालमत्तेची कागदपत्रे आणि पगाराच्या स्लिप्स भाड्याने देण्यास सुरुवात केली आहे. इराणचे अमेरिका आणि इस्रायविरोधातील युद्ध सहाव्या महिन्यानंतरही सुरु आहे. या संघर्षामुळे इराणला आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. आयएलएनएच्या वृत्तानुसार, लॅपटॉप भाड्याने घेण्याच्या मागणीत लक्षणीय वाढ झाली आहे. टायपिंग, मायक्रोसॉफ्ट ऑफिसचा वापर आणि ऑनलाइन क्लासेस यांसारख्या साध्या कामांसाठी नागरिक लॅपटॉप खरेदी करण्याऐवजी भाड्याने घेणे पसंत करत आहेत.

'स्टॅटिस्टिकल सेंटर ऑफ इराण'च्या आकडेवारीनुसार, जुलै अखेर इराणचा वार्षिक महागाई दर ६६ टक्क्यांवर पोहोचला आहे. आर्थिक अडचणींचा सामना करणारे नागरिक ऑनलाइन जाहिरातींच्या माध्यमातून उत्पन्नाचे मार्ग निर्माण करत आहेत. ऑनलाईन जाहिरातींमध्ये नैसर्गिक केसांच्या विक्रीच्या जाहिराती वाढल्या असून, केसांची लांबी, रंग आणि दर्जा यानुसार त्यांचे दर निश्चित केले जात आहेत.

इराणसमोरील आर्थिक संकट हे केवळ एका कारणामुळे निर्माण झालेले नसून, अनेक वर्षांपासून साचत गेलेल्या आर्थिक, राजकीय आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींचा एकत्रित परिणाम असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. आगामी काळात प्रादेशिक तणाव कमी होणे, आंतरराष्ट्रीय संबंध सुधारणा, गुंतवणुकीला चालना आणि रोजगारनिर्मितीला प्राधान्य देणे हे देशाच्या आर्थिक पुनरुत्थानासाठी महत्त्वाचे ठरणार आहे.

सध्या मात्र वाढती महागाई, बेरोजगारी आणि घटते क्रयशक्ती यामुळे इराणमधील सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन अधिक कठीण बनत असून, आर्थिक स्थैर्याची प्रतीक्षा अजूनही कायम आहे.



# बॉलिवूडचा 'गजनी' हरपला; अभिनेते प्रदीप रावत यांचे निधन

हिंदी चित्रपटसृष्टीतील दमदार खलनायक म्हणून ओळखले जाणारे आणि 'लगान', 'गजनी'सह अनेक गाजलेल्या चित्रपटांमधील प्रभावी भूमिकांमुळे प्रेक्षकांच्या मनात घर करणारे ज्येष्ठ अभिनेते प्रदीप रावत यांचे निधन झाले आहे. वयाच्या ७४व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

त्यांच्या निधनाची माहिती अभिनेते यशपाल शर्मा यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून दिली. त्यांच्या पश्चात पत्नी आणि मुलगा विक्रमादित्य असा परिवार आहे.

प्रदीप रावत गेल्या काही काळापासून रक्ताच्या कर्करोगाशी झुंज देत होते. त्यांच्या मॅनेजरने दिलेल्या माहितीनुसार, आजार पुन्हा बळावल्याने गेल्या महिनाभरापासून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. सुरुवातीला त्यांना कोकिलाबेन रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यानंतर पुढील उपचारांसाठी दुसऱ्या रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, डॉक्टरांच्या सर्व प्रयत्नांनंतरही उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

प्रदीप रावत यांनी आपल्या कारकिर्दीत 'लगान', 'गजनी' यांसारख्या सुपरहिट चित्रपटांमधून संस्मरणीय भूमिका साकारल्या. विशेषतः खलनायकाच्या भूमिका त्यांनी अत्यंत प्रभावीपणे साकारत हिंदी चित्रपटसृष्टीत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांच्या निधनाने चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली असून चाहत्यांसह अनेक कलाकारांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.



# डीपफेक विरोधात तब्बूची न्यायालयात धाव

बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री तब्बू हिने कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि डीपफेक तंत्रज्ञानाच्या वाढत्या गैरवापराविरोधात दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. तिचे नाव, छायाचित्र, आवाज आणि ओळख परवानगीशिवाय वापरणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी तिने याचिकेद्वारे न्यायालयाकडे केली आहे. तब्बूच्या याचिकेनुसार, काही व्यक्ती आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्म तिची परवानगी न घेता तिचे फोटो, नाव आणि ओळख व्यावसायिक कारणांसाठी वापरत आहेत. तसेच बनावट व्हिडिओ, जाहिराती आणि सोशल मीडियावरील पोस्टद्वारे तिच्या प्रतिमेचा गैरवापर केला जात असल्याचा आरोप तिने केला आहे. तिच्या मते, अशा प्रकारच्या कृतीमुळे तिच्या गोपनीयतेचा भंग होत असून अनेक वर्षांच्या मेहनतीने उभारलेली प्रतिष्ठाही धोक्यात येत आहे. या प्रकरणाची सुनावणी दिल्ली उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती ज्योती सिंह यांच्या खंडपीठासमोर झाली. सुनावणीदरम्यान तब्बूच्या वकिलांनी सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये काही त्रुटी आढळल्याचे न्यायालयाने नमूद केले. याचिकेत नमूद करण्यात आलेल्या संबंधित पक्षांची माहिती अपूर्ण आणि अचूक नसल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने पुढील सुनावणी तहकूब केली.

# श्रद्धाचा कमबॅक!



अभिनेत्री श्रद्धा कपूरच्या 'नागिन' या चित्रपटाबाबत एक अपडेट समोर आली आहे. ६ वर्षांपूर्वी श्रद्धा कपूरच्या 'नागिन' चित्रपटाची घोषणा झाली होती. पण नंतर हा चित्रपट बंद करण्यात आल्याची चर्चा सुरु झाली. परंतु आता या चित्रपटाचे काम सुरू असल्याची माहिती समोर आली आहे.

श्रद्धा कपूरच्या या आगामी चित्रपटाच्या निर्मात्यांनी स्पष्ट केले आहे की, हा चित्रपट बंद झालेला नाही आणि त्यावर अजूनही काम सुरू आहे. चित्रपटातील मुख्य भूमिकेसाठी श्रद्धा कपूरचे नाव निश्चित असून ती यामध्ये 'इच्छाधारी नागिन'ची भूमिका साकारणार आहे. चित्रपट निर्माते निखिल द्विवेदी यांनी सांगितले की, "मला माहीत आहे की मी अनेकदा या चित्रपटाबाबत विधान केले आहे, पण आता आम्ही हा चित्रपट लवकरच सुरु करणार आहोत." चित्रपटाचे शूटिंग अजून सुरू झालेले नाही, पण लवकरच सर्व गोष्टी पूर्वपदावर येतील. चित्रपटाबाबत कोणतीही नवीन माहिती न आल्याने चित्रपट रद्द झाल्याच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. मात्र, निर्मात्यांच्या स्पष्टीकरणामुळे पुन्हा आशेचा किरण दिसला आहे. 'नागिन' या चित्रपटासाठी अभिनेत्री श्रद्धा कपूर हिचे नाव आधीच निश्चित झाले असून, ती यात इच्छाधारी नागिणीची भूमिका साकारणार आहे. श्रद्धा कपूरने २०२० मध्ये एका ट्विटद्वारे ती मोठ्या पडद्यावर 'नागिन' बनणार असल्याची माहिती शेअर केली होती. दुसरीकडे, अभिनेता कार्तिक आर्यन देखील 'नागजिला' या चित्रपटातून सापांची वेगळीच दुनिया दाखवणार आहे.


# १०० चेंडू अन् २४१ धावा!

## सनरायझर्सने घडवला इतिहास; ‘द हंड्रेड लीग’मध्ये पहिल्यांदाच असं घडलं

**महाईन्यूज । इंग्लंड**

**इंग्लंडमध्ये सुरु असलेल्या द हंड्रेड लीग स्पर्धेत आतापर्यंत एकापेक्षा एक रोमांचक सामने पाहायला मिळाले आहेत. ४ ऑगस्टला झालेल्या सामन्यात लंडन स्पिरीट आणि सनरायझर्स लीड्स हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात धावांचा पाऊस पाहायला मिळाला आहे. पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठी आलेल्या सनरायझर्स लीड्स संघातील फलंदाजांनी धावांचा पाऊस पाडून १०० चेंडूंमध्ये स्कोअर बोर्डवर २४१ धावा लावल्या. या दमदार फलंदाजीच्या बळावर सनरायझर्स लीड्स संघाने द हंड्रेड लीग स्पर्धेतील मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.**





या सामन्यात सनरायझर्स लीड्सचा संघ प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरला होता. या संघाकडून मिचेल मार्श आणि रायन रिक्लटन या दोघांनी मिळून लंडन स्पिरीट संघातील गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. दोघांनी मिळून पहिल्या विकेटसाठी अवघ्या ५४ चेंडूंमध्ये विक्रमी १४८ धावा चोपल्या. ही द हंड्रेड लीग स्पर्धेच्या इतिहासातील आतापर्यंतची पहिल्या विकेटसाठी केलेली सर्वात मोठी भागीदारी ठरली. यादरम्यान मार्शने तुफान फटकेबाजी करुन अवघ्या ३७ चेंडूंमध्ये ७६ धावांची वादळी खेळी केली. त्याने २४ चेंडूंमध्ये आपलं अर्धशतक पूर्ण केलं. आतापर्यंत त्याने या स्पर्धेत एकूण २३ षटकार खेचले आहेत. यासह या स्पर्धेत सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तो अव्वल स्थानी आहे.

या सामन्यात सनरायझर्स लीड्सच्या दोन्ही फलंदाजांकडून तुफान फटकेबाजी पाहायला मिळाली. एका बाजूने मिचेल मार्श, तर दुसऱ्या बाजूने रायन रिक्लटनकडूनही दमदार फलंदाजी पाहायला मिळाली. रिकल्टनने अवघ्या २१ चेंडूंमध्ये आपलं अर्धशतक पूर्ण केलं. त्याने शेवटपर्यंत किल्ला लढवत ४२ चेंडूंमध्ये नाबाद ९४ धावांची खेळी केली. यादरम्यान त्याला शतक झळकावण्याची संधी होती. पण त्याचं शतक अवघ्या ६ धावांनी हुकलं. या दोघांनी वेगवान सुरुवात करुन दिल्यानंतर हॅरी ब्रूकने वादळी अर्धशतकी खेळी करुन दमदार शेवट केला. शेवटी फलंदाजी करताना ब्रूकने अवघ्या १५ चेंडूंमध्ये अर्धशतक पूर्ण केलं. हे या स्पर्धेच्या इतिहासातील संयुक्तरित्या सर्वात वेगवान अर्धशतक आहे. यादरम्यान त्याने १८ चेंडूंमध्ये ५५ धावांचे योगदान दिले. या खेळीच्या बळावर सनरायझर्स लीड्स संघाने २४१ धावांचा डोंगर उभारला. ही या स्पर्धेच्या इतिहासातील आतापर्यंतची सर्वात मोठी धावसंख्या आहे.

लंडन स्पिरीट संघाला हा सामना जिंकण्यासाठी १०० चेंडूंमध्ये २४२ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना लंडन स्पिरीट संघाला ६ गडी बाद २०४ धावांपर्यंत मजल मारता आली. यासह सनरायझर्स लीड्स संघाने हा सामना ३७ धावांनी आपल्या नावावर केला. पण हा सामना आतापर्यंतचा सर्वात रोमांचक सामना ठरला. कारण दोन्ही डावात मिळून एकूण ४४६ धावा जोडल्या गेल्या. यादरम्यान ३१ षटकार मारण्यात आले.

## भारत-श्रीलंका मालिकेआधी टीम इंडियाला दुहेरी धक्का!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारत आणि श्रीलंका या दोन्ही संघांमध्ये २ कसोटी सामन्यांच्या मालिकेचा थरार रंगणार आहे. या मालिकेसाठी भारतीय खेळाडू श्रीलंकेत दाखल झाले आहेत. पण ही मालिका सुरु होण्याआधीच भारतीय संघाला मोठा धक्का बसला होता. संघातील प्रमुख वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह दुखापतीमुळे या मालिकेतून बाहेर पडला आहे. त्याच्या जागी आकिब नबीला संघात स्थान देण्यात आलं आहे. दरम्यान मालिका सुरु व्हायला अवघे काही दिवस शिल्लक असताना भारतीय संघाला आणखी एक मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. स्टार फलंदाज साई सुदर्शन अजूनही पूर्णपणे फिट झालेला नाही. त्यामुळे तो या मालिकेतून बाहेर होऊ शकतो.**




एका सुत्राने पीटीआयला दिलेल्या माहितीनुसार, साई सुदर्शन सध्या बंगळुरुतील सेंटर ऑफ एक्सिलेंसमध्ये असून आपल्या पायाच्या बोटाला झालेल्या दुखापतीतून सावरत आहे. सध्या तो रिहॅब करत असून, फलंदाजीचा सराव देखील करत आहे. भारत आणि श्रीलंका या दोन्ही संघांमध्ये होणारा पहिला कसोटी सामना १५ ऑगस्टपासून सुरु होणार आहे.या मालिकेला सुरुवात होण्याआधी तो पूर्णपणे फिट होणार का, हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे. येत्या ३-४ दिवसात त्याच्या फिटनेसबाबत निर्णय घेतला जाणार आहे.

याआधी श्रीलंका दौऱ्यावर भारतीय अ संघाचं प्रतिनिधित्व करत असताना, त्याच्या पायाच्या बोटाला दुखापत झाली होती. या दुखापतीतून तो अजूनही पूर्णपणे सावरु शकलेला नाही. त्याला श्रीलंका दौऱ्यासाठी संघात तर स्थान देण्यात आलं आहे. पण तो खेळणार की नाही, हे त्याच्या फिटनेसवर अवलंबून असेल, हे आधीच स्पष्ट करण्यात आलं होतं. जर साई सुदर्शन पूर्णपणे फिट होऊ शकला नाही. तर त्याच्या जागी देवदत्त पडिक्कलला संधी दिली जाऊ शकते. या मालिकेतील दुसरा कसोटी सामना २३ ऑगस्टपासून सुरु होणार आहे. हा सामना कोलंबोत खेळवला जाणार आहे. साई सुदर्शन पूर्णपणे फिट होऊन दुसऱ्या कसोटी सामन्यात पुनरागमन करु शकतो.

या मालिकेतील पहिला कसोटी सामना १५ ऑगस्ट ते १९ ऑगस्टदरम्यान गॉलच्या मैदानावर खेळवला जाणार आहे. या सामन्याआधी ७ ऑगस्टपासून ते ९ ऑगस्टपर्यंत ३ दिवसीय सराव सामना खेळवला जाणार आहे. याआधी हा सामना ४ दिवसांचा होणार होता. पण बदल केल्यानंतर, हा सामना ३ दिवस खेळवला जाणार आहे. त्यानंतर मालिकेतील दुसरा सामना २३ ऑगस्ट ते २७ ऑगस्टदरम्यान खेळवला जाणार आहे. ही मालिका दोन्ही संघांसाठी अतिशय महत्वाची असणार आहे. कारण ही मालिका वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेचा भाग असणार आहे. गुणतालिकेत पाचव्या स्थानी असलेला भारतीय संघ आणि सहाव्या स्थानी असलेला श्रीलंकेचा संघ ही मालिका जिंकून गुणतालिकेत वर जाण्याच्या प्रयत्नात असणार आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। गुरूवार ।
दि. 06 ऑगस्ट 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

(22 October 1935 - 04 August 2026)

# भावपूर्ण श्रद्धांजली

PADMASHREE

# DR. D. Y. PATIL



A visionary leader.
An exceptional educationist.
A compassionate philanthropist.
His life was dedicated to education, healthcare and nation-building.

....

His legacy will continue to inspire generations to come

...

May his noble soul rest in eternal peace.

With profound respect,

**Prof. (Dr.) Manish Bhalla**
Vice Chancellor
D. Y. Patil International University, Akurdi, Pune

# महापालिकेचा ५५६ कोटींचा मालमत्ता कर वसूल

## डिजिटल माध्यमातून ५१२ कोटींची भर; चार लाखांहून अधिक मिळकतधारकांचा कर भरणा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने चालू आर्थिक वर्षात १ एप्रिल २०२६ ते ४ ऑगस्ट २०२६ (दुपारी १२ वाजेपर्यंत) या कालावधीत ५५६ कोटी ८४ लाख ३४ हजार ७२९ रुपयांचा मालमत्ता कर वसूल केला आहे. कर संकलन विभागाच्या विविध सवलत योजनांना मिळकतधारकांनी चांगला प्रतिसाद दिला असून अद्यापपर्यंत ज्या मिळकतधारकांनी मालमत्ता कर भरला नाही, त्यांनी तो विलंब न करता भरावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे.**



यंदा कर भरण्यासाठी नागरिकांनी ऑनलाइन सुविधेला मोठी पसंती दिली आहे. महापालिकेच्या ५५६ कोटीचा मालमत्ता कर वसूल झाला असून, त्यापैकी ५१२ कोटी ७७ लाख ९८ हजार ७०८ रुपये ऑनलाइन माध्यमातून, तर ४४ कोटी ६ लाख ३६ हजार २१ रुपये ऑफलाइन माध्यमातून जमा झाले आहेत. ऑफलाइन वसुलीत रोखीद्वारे २३ कोटी ८५ लाख ७० हजार १२२ रुपये, धनादेशाद्वारे १८ कोटी ४३ लाख ६७ हजार ५७२ रुपये आणि डिमांड ड्राफ्टद्वारे १ कोटी ७६ लाख ९८ हजार ३२७ रुपये जमा झाले आहेत.

शहरात निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मिश्र वापराच्या तसेच मोकळ्या जागांसह ७ लाख ४४ हजार ६३० नोंदणीकृत मालमत्ता आहेत. सर्व मालमत्ताधारकांना वेळेत कर देयके उपलब्ध व्हावीत, यासाठी महापालिकेने व्यापक नियोजन केले होते.



> “ महापालिकेच्या विकासकामांना आर्थिक बळ देण्यासाठी मालमत्ता कर हा महत्त्वाचा महसुलाचा स्रोत आहे. नागरिकांनी वेळेत कर भरून विकास प्रक्रियेत सहभाग नोंदविला आहे, ही समाधानाची बाब आहे. ज्या मिळकतधारकांनी अद्याप कर भरलेला नाही, त्यांनी विलंब न करता मालमत्ता कर भरून महापालिकेला सहकार्य करावे.
>
> - **डॉ. विजय सूर्यवंशी**, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.



> “ पिंपरी चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मालमत्ता कराचे वेळेवर संकलन अत्यंत महत्त्वाचे आहे. शहरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर मालमत्ता कर भरून विकासकामांप्रती आपली जबाबदारी पार पाडली आहे. विशेष म्हणजे, ऑनलाइन माध्यमातून कर भरण्यास नागरिकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा डिजिटल सेवांवरील विश्वासाचे द्योतक आहे. ज्या मिळकतधारकांनी अद्याप मालमत्ता कर भरलेला नाही, त्यांनी विलंब न करता कर भरून शहराच्या विकासात आपले योगदान द्यावे.
>
> - **रवि लांडगे**, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# अपयशाची भीती बाळगू नका, सकारात्मक विचार करा, नक्कीच यश मिळेल; सिध्दार्थ जाधव

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**जीवनात कधीही न्यूनगंड आणि अपयशाची भीती बाळगू नका. नेहमी प्रयत्नशील रहा, धाडसी बना. कोणतीही कृती पूर्ण क्षमतेने, समर्पण भावनेने आणि सकारात्मक विचाराने केल्यास नक्कीच यश मिळेल, असा सल्ला सुप्रसिध्द मराठी अभिनेता सिद्धार्थ जाधव याने तरूणाईला दिला.**



चिंचवड येथे प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट आणि दिशा सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ‘सिद्धार्थ जाधवशी दिलखुलास गप्पा’ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जवळपास दीड तास चाललेल्या या कार्यक्रमात सिध्दार्थने विद्यार्थ्यांशी अगदी मनमोकळ्या गप्पा मारत त्यांच्या विविध प्रश्नांची उत्तरेही दिली.

यावेळी प्रतिभा इन्स्टिट्यूटचे संस्थापक सचिव दीपक शहा, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. वनिता कुऱ्हाडे, दिशा सोशल फाऊंडेशनचे अध्यक्ष बाळासाहेब जवळकर यांच्यासह राजेंद्र करपे, गोरख भालेकर, सचिन साठे, नाना शिवले, संतोष बाबर, अविनाश ववले, नंदकुमार कांबळे, संतोष चांदेरे आदी उपस्थित होते.

सिध्दार्थ म्हणाला की, मला माझ्या दिसण्याचा न्यूनगंड होता. स्वतःमध्ये आहे. ते प्रथम स्वीकारावे आणि स्वतःवर प्रेम करायला शिकले पाहिजे. मला माझा 'आरसा' देखील प्रेरणा देतो. स्वतःच्या क्षमता ओळखता आल्या पाहिजे. कोणतीही कृती करताना सर्वस्व झोकून दिले द्या व समर्पण भावनेने करा. ते तुमच्यासाठी सर्वोत्तमच असेल. जीवनात आपण नेहमी दुसऱ्यांच्या विचारांनुसार वागू लागतो, ते चुकीचे आहे.

सिध्दार्थ म्हणाला, जगात तुमचे आई-वडील हेच तुमचे ‘बेस्ट फ्रेंड’ आहेत. त्यांना कधी ‘इमोशनल ब्लॅकमेल’ करू नका. त्यांच्याशी नेहमी आदरयुक्त संवाद ठेवा. माझे आई-वडील माझ्यासाठी प्रेरणादायी आहेत. महाराष्ट्र शासनाने मला व्यसनमुक्तीचा ‘ब्रँड अँबेसिडर’ केले, हा माझ्या आई-वडिलांचा व त्यांनी माझ्यावर केलेल्या संस्काराचा सन्मान होता, असे मी मानतो.

सर्वच क्षेत्रात अपयश असते, परंतु ते कायमस्वरूपी नसते, त्यातून निराश व्हायचे नाही. दारू, सिगारेट सारख्या व्यसनांपासून दूर राहायचे आणि नैराश्यात कधीही आत्महत्येचा विचार करायचा नाही, असे तो म्हणाला.

रूप, सौंदर्य हे नश्वर आहे. आपल्या कर्तुत्वातून आपले वलय निर्माण करावे. मला एफटीआयआय किंवा ललित कला केंद्रात प्रवेश मिळाला नाही. मला द्रोणाचार्य मिळाले नाहीत. मात्र, मी अनुभवाच्या जोरावर एकलव्य होऊ शकलो, अशा भावना सिध्दार्थने व्यक्त केल्या. प्रास्ताविक नाना शिवले यांनी केले. सूत्र संचालन डॉ. रवींद्र निरगुडे यांनी व आभारप्रदर्शन सुरेखा कुंभार यांनी मानले.

### महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना "माणूस" म्हणायचे का ?

सिध्दार्थ जाधवने "ॲनिमल" नाटकातील काही संवाद व प्रसंगांचे यावेळी सादरीकरण केले. याविषयी तो म्हणाला की, आई, वडील आणि गुरुजनांकडून आपल्यावर वेळोवेळी संस्कार होत असतात. मात्र, काही लोक मानवाचा जन्म मिळून देखील जनावराप्रमाणे वर्तणूक करतात. चार वर्षाच्या बालिकेपासून ते म्हाताऱ्या महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना "माणूस" म्हणायचे का ?, असा सवाल त्याने केला. "ॲनिमल" या नाटकात याच ज्वलंत विषयावर आत्मपरीक्षण करायला भाग पाडणारा आशय मांडण्यात आला आहे, असे सांगून हे नाटक सर्वांनी सहकुटुंब पाहून बोध घेतला पाहिजे, असे आवाहन त्याने केले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 'नशा मुक्त युवा फॉर विकसित भारत संकल्प अभियान'चा शुभारंभ

## निगडीच्या अमृता विद्यालयम् व जुनिअर कॉलेजचा उत्स्फूर्त सहभाग

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**भारत सरकार आणि माता अमृतानंदमयी मठ यांच्या संयुक्त विद्यमाने निगडी येथील अमृता विद्यालयम् आणि जुनिअर कॉलेजमध्ये 'नशा मुक्त युवा फॉर विकसित भारत' या महत्त्वपूर्ण अभियानांतर्गत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. युवा पिढीला व्यसनाधीनतेपासून वाचवण्यासाठी आणि समाजात त्याविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या कार्यक्रमाची सुरुवात अम्मांचे शिष्य ब्रह्मचारी राजेश कुमार यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करण्यात आले. त्यानंतर उपस्थित विद्यार्थी व मान्यवरांनी प्रार्थना केली आणि काही वेळ ध्यान करत कार्यक्रमाची सकारात्मक सुरुवात झाली.**






कार्यक्रमाचा अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे देशाचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी आणि सद्गुरु माता अमृतानंदमयी देवी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेला राष्ट्रीय ऑनलाईन लॉन्च कार्यक्रम ठरला, ज्यामध्ये अमृता विद्यालयम् आणि ज्यु. कॉलेज, निगडी, पुण्याच्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन सहभाग घेतला. या ऑनलाईन राष्ट्रीय महाअभियानाच्या उद्घाटनादरम्यान पंतप्रधानांनी विकसित भारताच्या निर्मितीमध्ये युवकांची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करत, निरोगी आणि व्यसनमुक्त जीवनाचे महत्त्व उपस्थितांना समजावून सांगितले. तसेच माता अमृतानंदमयी देवी यांच्या ऑनलाईन संदेशाद्वारे युवकांनी आध्यात्मिक बळावर आणि सकारात्मक विचारांनी व्यसनांपासून दूर राहून आपले जीवन उज्ज्वल करावे असा मोलाचा संदेश लाभला.

कार्यक्रमात शाळेतील तब्बल १२०० विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या सर्वांनी ऑनलाईन आणि ऑफलाईन माध्यमातून नशा मुक्त राहण्याची तसेच समाजात या बाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रतिज्ञा घेतली. शाळेच्या शिक्षिका सौ. जया अरविंद यांनी उपस्थितांना ऑफलाईन प्रतिज्ञा दिली. शाळेचा माजी विद्यार्थी श्री. प्रतीक राटडीया याने विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्याने विद्यार्थ्यांना अभ्यास कसा करावा, सध्याच्या अभ्यासाचा भविष्यातील करिअरवर कसा प्रभाव पडतो आणि नशेमुळे आरोग्यावर व भविष्यावर होणारे दुष्परिणाम याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका ब्रह्मचारिणी पावनामृता चैतन्या यांच्या मार्गदर्शनाखाली हा संपूर्ण कार्यक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. शिजा नायर, आभार प्रदर्शन: सौ. वृंदा महाजन यांनी केले.

या उपक्रमांतर्गत शाळेमध्ये ९ ऑगस्टपर्यंत विविध स्पर्धा व जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने खालील कार्यक्रमांचा समावेश आहे: रॅली (प्रभात फेरी), सह्यांचा उपक्रम (स्वाक्षरी मोहीम), पोस्टर मेकिंग स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, प्रश्नमंजुषा (प्रश्नोत्तरे) स्पर्धा, निबंध स्पर्धा.

# Good Habits: The Foundation of a Healthy Life



**Good habits are the foundation of a healthy, productive, and balanced life. They automate positive choices, reduce daily stress, and help you reach long-term goals. By building routines like regular exercise, balanced nutrition, and consistent sleep, you conserve mental energy and boost your overall well-being.**

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE

Here are actionable, science-backed habits you can integrate into your daily life to dramatically improve your physical and mental health.

**Prioritize Consistent Sleep**

Aim for 7 to 8 hours of sleep per night. Going to bed and waking up at the exact same time every day—even on weekends—regulates your circadian rhythm, sharpens your focus, and lowers stress.

**Move Your Body Daily**

You don't need intense gym sessions every day. Simple activities like a 30-minute walk, light stretching, or yoga improve cardiovascular health, reduce sedentary fatigue, and release mood-boosting endorphins. Long workouts can feel overwhelming, but 5-minute movement breaks—like a quick stretch or a short yoga routine—remove the mental barrier to getting started. Doing a small amount of exercise every single day is far more effective for long-term health and energy than doing a gruelling workout once a week because consistency builds the habit.

**Make a Study Time Table**

A well-planned study timetable helps students maintain discipline and balance in their daily lives. It should include time for yoga, school, study, rest, play, reading, family interaction, and adequate sleep. Following a regular routine improves time management, enhances concentration, reduces last hour rush and anxiety

**Maintain a Nutrient-Dense Diet**

Focus on making sustainable swaps rather than strict restrictions. Incorporate more whole grains, healthy fats (like avocados or olive oil), and lean proteins. Drink plenty of water throughout the day to stay hydrated and maintain steady energy levels

**Limit Screen Time**

Reduce unnecessary screen time, especially before bedtime. Excessive use of mobile phones, television, or other digital devices can disturb sleep quality and reduce productivity. Instead, spend time reading books, engaging in hobbies, or having meaningful conversations with family members

**Aryan Mohan Ugale,**
**Grade VII.Cosmonaut,**
**Priyadarshani School,Moshi.**

DTE Code 6310

Approved by AICTE | Accredited by NAAC | Accredited by NBA

PCET- NUTAN

# Nutan Maharashtra Institute of Engineering and Technology

Autonomous Institute | SPPU Affiliated

## Admissions Open for Academic Year 2026–27

| Degree | Programme Name | Choice Code | Intake |
|---|---|---|---|
| B.Tech | Computer Engineering (CE) | 631024510 | 240 |
| B.Tech | Computer Science Engineering (CSE) | 631024210 | 180 |
| B.Tech | Artificial Intelligence & Data Science (AI&DS) | 631099510 | 120 |
| B.Tech | Information Techanology (IT) | 631024610 | 120 |
| B.Tech | CSE Artificial Intelligence (CSE AI) | 631091310 | 60 |
| B.Tech | Electronics and Telecommunication (E&TC) | 631037210 | 120 |
| B.Tech | Mechanical Engineering | 631061210 | 120 |
| B.Tech | Electronics & Computer Engineering | 631084410 | 120 |
| M.Tech | Computer Engineering (CE) | 0631024510 | 12 |
| M.Tech | E&TC (IoT & Sensor System) | 0631095210 | 12 |
| BCA | Bachelor of Computer Applications (BCA) | 0631010110 | 120 |
| MBA | Master of Business Administration (MBA) | 0631010110 | 120 |
| MCA | Master in Computer Application (MCA) | 0631010110 | 120 |
| LL.B. | Bachelor of Laws | 26031 | 60 |
| B.Sc | Cyber and Digital Science (B.Sc) | - | 60 |
| B.Voc. | Bachelor of Vocation (B.Voc.) | - | 180 |

Highest Package for PCET-Nutan **61 Lakh P.A.**

Average Salary Package **5.5 Lakh P.A.**

For Admissions Contact:

**8830992988 / 7423080910 / 9028101155**



Scan the QR Code Today to Get More Information

Samarth Vidya Sankul, Vishnupuri, Talegaon Dabhade, Pune – 410507